# अहवाल

**शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ रेठरे बु. चे**

## कृष्णा महाविद्यालय रेठरे बु.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**एक दिवसीय राष्ट्रीय ई - चर्चासत्र**

## मध्ययुगीन मराठी साहित्यातील विविध संप्रदाय

**आयोजक - मराठी विभाग आणि Internal Quality Assurance Cell (IQAC)**

**बुधवार २६ ऑगस्ट २०२० वेळ - सकाळी ११ वाजता**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ रेठरे बु. चे कृष्णा महाविद्यालय रेठरे बु.ता कराड जि- सातारा मराठी विभाग आणि Internal Quality Assurance Cell (IQAC) आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय ई – चर्चासत्र "मध्ययुगीन मराठी साहित्यातील विविध संप्रदाय" चे आयोजन बुधवार २६ ऑगस्ट २०२० वेळ - सकाळी ११ वाजता केले गेले. या चर्चासत्रासाठी प्रमुख अतिथी – मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. दत्ता पाटील सहभागी झाले. तसेच व्याख्याते म्हणून महावीर महाविद्यालय कोल्हापूर येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. गोमटेश्वर पाटील सहभागी झाले. या चर्चासत्राचे उदघाट्न शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार सोनाळकर यानी केले.

"वारकरी संप्रदाय आणि सामाजिकता" या विषयावर डॉ. दत्ता पाटील यानी मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील एक प्रमुख वारकरी संप्रदाय म्हणून या संप्रदायाची ओळख आहे. या संप्रदायाच्या तत्वज्ञानाची नव्याने ओळख करुन देण्याचे महत्वपूर्ण काम त्यानी या प्रसंगी केले. मानवतावादी, समतावादी तसेच विचारांचा जागर संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामापर्यंत सर्व संतानी कसा केला ते त्यानी विविध उदाहरणाच्या माध्यामांतून स्पष्ट केले. डॉ. गोमटेश्वर पाटील यानी "जैन संप्रदाय आणि साहित्य" या विषयावर मार्गदर्शन केले. जैन धर्माचे तत्वज्ञान त्यांनी या प्रसंगी मोठया प्रभावीपणे मांडले. जैन धर्मियांचे २४ वे तीर्थकार भगवान महावीरांच्या विचारांची थोरवी त्यांनी या प्रसंगी सांगितले. प्रामुख्याने ' अंहिसा परमो धर्मो' ची सकल्पना त्यांनी विस्ताराने सांगितली. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि अहिंसा याची ओळख त्यांनी करुन दिले.

डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाची ओळख करुन देताना या संघाचे महत्व विस्ताराने सांगितले. शिक्षक संघाने आतापर्यंत केलेल्या कार्याचे मूल्यमापन केले. मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी अशा चर्चासत्राची आवश्यकता असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. मध्ययुगीन मराठी साहित्य म्हणजे आपल्या मराठी भाषेचा अमूल्य ठेवा अस्ल्याचे आणि याचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली जबाबदारी व कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

मध्ययुगीन मराठी साहित्यातील विविध संप्रदाय या ई- चर्चासत्राचे अध्यक्ष मा. प्राचार्य सी.बी. साळुंखे यानी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात मराठी भाषेविषयी नितांत आदर व्यक्त केला. मराठी भाषेचे म्हणजेच मातृभाषेचे बारकावे या भाषेचे भाषा कौशल्य आत्मसात केल्याशिवाय आपल्याला समजत नाही. हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यामांतून स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख सहयोगी प्राध्यापक डॉ. महावीर कांबळे यांनी केले. या चर्चासत्रामध्ये उपस्थित असलेल्या सर्व मान्यवर पाहुण्यांचे तसेच या चर्चासत्रात सहभाग नोंदवाणार्या सर्व मान्यवरांचे आभार व या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यपक प्रा. माधवी पवार यानी केले.

ई – चर्चासत्रासाठी महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, ओडिसा, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गोवा, तेलगना केरळ, बिहार, दिल्ली, तमिळनाडु या राज्यातील एकूण ६१२ प्राध्यापकांनी उपस्थिति दर्शवली. इतक्या मोठ्या प्रमाणात परराज्यांतील सहभागी प्राध्यपकांचा विचार करता या कर्यक्रमाचे हेच मोठे वैशिष्ट्ये ठरते.

**राष्ट्रीय चर्चासत्रात विविध राज्यांतून सहभागी झालेली विभागणी**

| अ.नं | राज्य | संख्या |
|---|---|---|
| १ | कर्नाटक | १८ |
| २ | ओडीसा | १७ |
| ३ | उत्तर प्रदेश | ०९ |
| ४ | मध्यप्रदेश | ०२ |
| ५ | गोवा | ०४ |
| ६ | तेलंगणा | ०१ |
| ७ | केरळ | ०१ |
| ८ | बिहार | ०२ |
| ९ | दिल्ली | ०२ |
| १० | छत्तीसगड | ०६ |
| ११ | तमिळनाडू | ०१ |
| १२ | राजस्थान | ०१ |
| १३ | आसाम | ०३ |
| १४ | महाराष्ट्र | ५४५ |
| एकूण | | ६१२ |

अशा रीतीने मध्ययुगीन मराठी साहित्यातील विविध संप्रदाय" या ई- चर्चासत्राचे यशस्वीपणे आयोजन करुन आपल्या महाविद्यालयाने मध्ययुगीन मराठी साहित्याच्या संदर्भाने मोठे योगदान दिल्याचे दिसून येते.

Dr. M. V. Kamble
M. A., Ph.D. SET
Head, Department of Marathi
Krishna Mahavidyalaya,
Rethare BK, Tal-Karad 415108

डॉ. महावीर कांबळे

PRINCIPAL
KRISHNA MAHAVIDYALAYA
RETHARE (BK), TAL. KARAD

प्रा. माधवी पवार